**महाराष्ट्र शासन**
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
www.dhepune.gov.in E-Mail- mavi.dhepune@nic.in
फोन नंबर -०२०/२६१२२११९,२६०५१५१२,२६१२४६३९ फॅक्स नंबर ०२०/२६१११९५३

क्रमांक- एनजीसी/२०१५/एचटीई-सेवार्थ/मवि-२-३ /3780 दिनांक- एप्रिल, २०१५

**परिपत्रक-** 17 APR 2015

**विषय- एचटीई-सेवार्थ प्रणालीव्दारे राज्यातील अकृषि विद्यापीठातील शासनमान्य अनुदानित पदावरील व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शासनमान्य अनुदानित पदावरील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्त्याची देयके तयार करण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

संदर्भ- १. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक सेवार्थ-२०१२/प्र.क्र.२८०/१२/मशि-५ दि. २३ नोव्हेंबर, २०१२
२. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक सेवार्थ-२०१२/ (४१७/१२)/विशि-१ दि. २६ नोव्हेंबर, २०१२
३. शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक सेवार्थ-२०१३/प्र.क्र.२४(भाग-२)/आस्था-२, दिनांक १६.४.२०१५
४. मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे अर्धशासकीय पत्र क्रमांक सेवार्थ २०१३/प्र.क्र.२४/भाग-२/आस्था-२ दिनांक १६.४.२०१५

उपरोक्त विषयाबाबत राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यांची देयके सेवार्थ या प्रणालीव्दारे करण्यात येत आहे. या धर्तीवर राज्यातील अकृषि विद्यापीठाशी संलग्नित संचालक उच्च शिक्षण यांच्या नियंत्रणाखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे प्रदान संगणकीय प्रणाली प्रतिष्ठापित करुन सर्व प्रदानाची माहिती सेंट्रल सर्व्हरव्दारे केल्यास सदर खर्च योग्य प्रकारे होतो याची खातरजमा करणे शासनास शक्य होईल. यास्तव वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश विचारात घेऊन या विभागासाठी सुधारित केलेल्या एचटीई सेवार्थ या नवीन वेतन प्रणालीव्दारे वेतन व भत्ते देयके तयार करण्याबाबत सं दर्भ क्रमांक १ नुसार विभागाने निर्णय घेतलेला आहे.

राज्यातील अकृषि विद्यापीठे तसेच डेक्कन कॉलेज पदव्युत्तर संशोधन संस्था पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे आणि गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था पुणे या शासन अनुदानित अभिमत विद्यापीठामधील शिक्षकीय व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचे प्रदान नवीन वेतन प्रणालीव्दारे करणेबाबत संदर्भ क्रमांक २ नुसार निर्णय घेतलेला आहे. ही बाब आपणास विदित आहेच.

या अनुषंगाने शासन निर्णयातील विवरणपत्राच्या अनुषंगाने वेतन देयकाकरिता लागणारी आवश्यक ती माहिती भरण्यासाठी प्राथमिक जबाबदार आणि प्रमाणित करुन माहिती सादर करणारा अधिकारी तसेच कार्यक्षेत्रातील

सर्व संस्थांचे वेतन देयकाकरिता लागणारी आवश्यक असणारी माहिती अचूक असल्याबाबत प्रमाणित करण्यासाठी जबाबदार अधिकारी व या संपुर्ण कामाकरिता पर्यवेक्षक/सनियंत्रण आणि प्रमाणपत्रावर प्रतिस्वाक्षरी करणारा अधिकारी याबाबत उक्त शासन निर्णयामध्ये जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण यांच्यासमवेत दिनांक १५.०४.२०१५ च्या बैठकीमध्ये एचटीई-सेवार्थ प्रणाली राज्यातील अनुदानित विद्यापीठे व संलग्नित अशासकीय महाविद्यालयातील कार्यरत शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकरिता लागू करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

१.एचटीई-सेवार्थ प्रणालीमध्ये भरलेली माहिती अंतिम राहील त्यामध्ये पुन्हा बदल करता येणार नाही ही बाब विचारात घेता स्पष्ट व अचूक माहिती भरणे क्रमप्राप्त आहे.

२.या प्रणालीव्दारे अदा करण्यात येणारे कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन यापुढे संस्थामधील प्राचार्य/संचालक/कुलसचिव यांचेमार्फत न करता थेट संबंधित अध्यापकीय व अध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बॅक खाती ईसीएस व्दारे जमा करावयाचे आहे अथवा कोषागाराने विभागीय वेतन प्रमुख(प्रशासन अधिकारी) यांचे कार्यालयातील आहरण व संवितरण अधिकाऱ्यांच्या बॅक खात्यात ईसीएस व्दारे जमा करावी व तद्नंतर ते थेट कर्मचाऱ्यांच्या खात्यात जमा करावे.

३.या प्रणालीच्या माध्यमातून वेतन ईसीएस व्दारे संबंधित कर्मचाऱ्यांच्या बॅक खात्यात जमा होणार असल्याने कर्मचाऱ्यांच्या बॅक खात्याबद्दलची अधिकृत माहिती संबंधित संस्थेकडून घेणे आवश्यक आहे. शासन निर्णयातील परिशिष्ठ अ व ब प्रमाणपत्रे स्वाक्षरीनिशी सर्व कर्मचाऱ्यांकडून प्राप्त करुन घ्यावी व ती संग्रही ठेवावी.

४.या प्रणालीव्दारे माहिती भरल्यानंतर सर्व मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालये/संस्थामधील वेतन देयकाकरिता लागणारी आवश्यक ती सर्व माहिती त्या त्या महाविद्यालय/संस्थेच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी संबंधित महाविद्यालयाचे/संस्थेचे प्राचार्य/संचालक यांचेकडून सही व शिक्यानिशी प्राप्त होणाऱ्या माहितीची मुद्रित प्रत उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन पडताळणी करुन विभागीय वेतन पथक प्रमुख (प्रशासन अधिकारी) यांचेकडे सादर करावी. विभागीय वेतन प्रमुख (प्रशासन अधिकारी) यांनी वेतन प्रणालीतून तयार होणारे प्रमाणपत्र मुद्रित करुन घ्यावे व त्यावर स्वाक्षरी करुन विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांचेकडे सादर करावे. विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण यांनी त्याची एक प्रत स्वत:कडे ठेवून दुसरी प्रत संचालक उच्च शिक्षण यांचेकडे पाठवावी.

५.विभागीय वेतन पथक प्रमुख/प्रशासन अधिकारी यांनी त्यांना प्रदान करण्यात आलेल्या संकेतांकाने या प्रणालीमध्ये प्रवेश करुन संबंधित महाविद्यालये/संस्था/विद्यापीठे यांची माहिती तपासून मान्य करण्यात यावी अशा प्रकारे माहिती मान्य केल्याशिवाय संबंधित महाविद्यालये/संस्था/विद्यापीठे यांना पुढील कार्यवाही करता येणार नाही याची नोंद घ्यावी

६.या प्रकरणी शासन स्तरावर वेळोवेळी बैठकांचे आयोजन करुन करावयाच्या कार्यपध्दतीबाबत स्पष्ट निर्देश देण्यात आलेले आहेत. माहे जून २०१५ वेतन अदायगी जुलै २०१५ मध्ये करण्यासाठी या प्रणालीमार्फतच

देयके सादर करण्याचे निश्चित झाल्याने या प्रणालीव्दारे वेतन अदायगीसाठी करावयाची सर्व उपाययोजना संबंधित विभागीय सहसंचालक यांनी त्यांचे स्तरावर कालबध्द कार्यक्रम वा शिबीर आयोजन करुन करावयाचे आहे. जून २०१५ नंतर प्रणालीशिवाय वेतनदेयक कोषागार कार्यालयाकडे घेतली जाणार नाही याची सर्व विभागीय सहसंचालक यांनी नोंद घ्यावी.

७.संचालनालयाचे दिनांक २४ जानेवारी, २०१३ च्या पत्रानुसार एचटीई-सेवार्थ प्रणालीबाबत माहिती प्रणालीमध्ये अंतर्भूत करावयाच्या सर्व शासन आदेश/मान्यता/टप्पा अनुदानाचे आदेश याची खातरजमा करुन प्रणालीमध्ये भरावयाची आहे. महाविद्यालयनिहाय/कर्मचारीनिहाय अशी माहिती संकलित करावयाची कार्यपध्दती ठरवून दिल्याप्रमाणे सातत्यपुर्ण पाठपुरावा करुन विनाविलंब डेटा एन्ट्री भरणे अभिप्रेत आहे. यामध्ये सबबी, दिरंगाई वा विलंब विचारात घेतला जाणार नाही याचीही विभागीय सहसंचालक यांनी नोंद घ्यावी.

८.या प्रणालीची तात्काळ अंमलबजावणी करण्यासाठी येत असणाऱ्या तांत्रिक अडचणीच्या निराकरणासाठी संचालनालय स्तरावर सुकाणू समिती गठीत करण्यात आलेली आहे. विभागीय स्तरावर येणाऱ्या अडचणी या समितीस stat.dhepune@nic.in या ई-मेलवर पाठवून निराकरण करुन घ्यावे. तसेच या संदर्भात थेट संपर्कासाठी सांख्यिकी अधिकारी श्री बिरादार यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ९८२२८८९८७७ वर संपर्क साधावा.

क्रमांक ६ मध्ये नमूद केलेली अंतिम मर्यादा विचारात घेता विभागीय स्तरावर कार्यवाहीसाठी आवश्यक त्या उपाययोजना अतितात्काळ राबविण्याची कार्यपध्दती निश्चित करुन साप्ताहिक आढावा लेखी स्वरुपात नमूद ई-मेलवर सादर करावा.

मा.प्रधान सचिव उच्च व तंत्र शिक्षण यांनी दिनांक १५.०४.२०१५ रोजी दिलेले उक्त प्रकरणाचे सर्व निर्देशाचे तंतोतंत पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

**(डॉ.धनराज माने)**
शिक्षण संचालक(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य,पुणे-१.

**प्रति-**

**सर्व विभागीय सहसंचालक**
उच्च शिक्षण.

प्रत-
१.विभागीय वेतन प्रमुख तथा प्रशासन अधिकारी, सर्व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण कार्यालये
२.कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे
३.कुलसचिव, डेक्कन कॉलेज पदव्युत्तर व संशोधन संस्था पुणे.
४.कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
५.कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
६.सर्व वित्त व लेखा अधिकारी, अकृषि विद्यापीठे महाराष्ट्र राज्य.